# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 13/07/2020 (सोमवार)
(दुपार)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत माथनी टोल नाका मौदा येथे दिनांक 12/07/2020 चे 11.47 वा. दरम्यान मौदा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 40/ व्हाय – 7790 क्रमांकाच्या बोलेरो पिकअप गाडीला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी नामे– अक्षय धनराज बावनकर, वय 25 वर्ष, रा. बाजार चौक वडोदा, कामठी याच्या ताब्यातुन 8(बैल, गोरे) जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती 4,78,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. कोमल कडु, पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(डि)(ई)(फ) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 119 महाराष्ट्र पोलीस अधिनियम, तसेच कलम 109 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ठाकुर हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन मौदाचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री मधुकर गिते यांचे नेतृत्वात पोलीस हवालदार विजय ठाकुर, पोलीस नायक कोमल कडु यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

### गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 20 कि. मी. अंतरावर मलापुर शिवार येथे दिनांक 12/07/2020 चे 17:20 वा. दरम्यान रमेश नागोराव कामडी(मृतक), वय 38 वर्ष, रा. मोहगाव भदाडे यांना एका वर्षापासून डोक्याचा त्रास असल्याने सदर त्रासाला कंटाळुन त्यांनी शेतात कडू लिंबाच्या झाडाला दुपट्टयाने गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नागोराव मुकूंदा कामडी, रा. मोहगाव भदाडे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. नरखेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार धनराज भुक्ते हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 06 कि. मी. अंतरावर मौजा तारोली शिवार येथे दरम्यान फिर्यादी यांच्या कडे यशवंत निलकंठ नरूले, वय 45 वर्ष, रा. तारोली हे रोजंदारीने कामाला होते. यशवंत नरूले यांनी फिर्यादीस विहीरीवरून मोटर चालु करून येतो असे सांगुन गेले असता बराच वेळ ते परत न आल्याने फिर्यादीने जाउन पाहिले असता ते मोटर जवळ ईलेक्ट्रीक करंट लागुन मृत अवस्थेत मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कार्तीक बळीराम रोहाड, वय 27 वर्ष, रा. तारोली यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास मनापोशि स्वाती लोखंडे या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर